P.A-(1)

26)

किरकोळ फौजदारी केस नं.८१/२०२६

## मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, जयसिंगपूर

यांचे कोर्टात...

**सौ.रागिनी अरविंद कांडेसार** ------ अर्जदार

विरूद्ध

**महाराष्ट्र सरकार** ----- वि.प.

आणि

**श्री.अमीर फिरोज शेख** ----- थर्ड पार्टी अर्जदार

व.व.२९, धंदा–व्यापार,

रा.शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

Exh.17
Order
Call the say
of applicant

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.06.29 17:36:55 +0530

<u>यातील थर्ड पार्टी अर्जदार तर्फे विनंती अर्ज असा की,</u>

१) प्रस्तुत कामी यातील मुळ अर्जदार यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे दाखल केलेल्या अर्जातील संपुर्ण कथने साफ खोटी, चुकीची व लबाडीची असुन केवळ स्वार्थ बुद्धीने कायद्याचा अन्यायी व दुरूपयोग करुन घेणेच्या उद्देशाने प्रस्तुत अर्जाची रचना केली असलेने यातील थर्ड पार्टी अर्जदार यांना त्यातील कोणतीही कथने मान्य व कबुल नाहीत. ते त्याचा साफ इन्कार करतात.

२) प्रस्तुत कामी यातील अर्जदार यांनी दाखल केलेला मुद्देमाल परत मागणीच्या अगर कॅप्रीगोल्ड फायनान्स कंपनी, बजाज फायनान्स कंपनी, मुथुट फायनान्स कंपनी,

20/6/26
Assistant. Superintendent
Civil Court.Jaysingpur.

मनी टू फायनान्स कंपनी व मनीपुरम फायनान्स कंपनी वगैरे इत्यादी फायनान्स कंपनी मधील अर्जदार व अर्जदारांच्या अन्य नात्यातील जयसिंगपूर पोलीस ठाणे गु.र.नं.७५/२०२६ मधील मुख्य आरोपी सागर अरविंद कांडेसार यांनी सदर गुन्ह्यातील मुळ फिर्यादी सुनिल अशोक कोळी व तसेच थर्ड पार्टी अर्जदार यांच्या मालकीचा सोन्याचे जिन्नसाचा मुद्देमाल हा अर्जदार व मुख्य आरोपी यांचे आई–वडील व मामे भाऊ यांच्या नावे बेकायदेशीर तारण ठेवलेचे गुन्ह्याचे कामी तपासामध्ये निष्पन्न झाल्याने त्याचा तपास कामाच्या दृष्टीकोणातुन प्रस्तुत कायद्यातील तरतुदीप्रमाणे तपास होवून त्याअनुषंगाने तपास टिप्पन करणेची प्रक्रिया चालू असुन, सदर तपासाचे कामी अर्जदार यांनी मागणी केलेल्या मुद्देमालापैकी काही मुद्देमाल हा थर्ड पार्टी अर्जदार यांचाही असलेचे तपासा दरम्यान निष्पन्न झालेनंतर त्या मुद्देमालाचे अनुषंगाने थर्ड पार्टी अर्जदार यांचे तपास अंमलदार यांनी तपास टिप्पनाद्वारे जबाबही नोंदवून घेतलेला आहे.

३) यातील मुळ अर्जदार यांनी अर्जातील मुद्देमालाचे अनुषंगाने मागणी केलेली दाद पहाता, मुळ अर्जदार हे मुद्देमालाचे कोणत्याही प्रकारे कायदेशीर मालक नसल्याने व तपासा दरम्यान यातील मुळ फिर्यादी थर्ड पार्टी अर्जदार व अन्य लोकांच्या मालकीचा मुद्देमाल हा बेकायदेशीर सावकारीच्या व्यवसायातुन मुळ आरोपी यांच्या ताब्यात असलेला सदर मुद्देमाल हा आरोपी यांनी अर्जदार व मुळ आरोपी यांच्या नात्यातील अन्य इसमांच्या नावे वरील नमुद फायनान्स कंपनी मध्ये गहाण ठेवलेचे सकृत दर्शनी निष्पन्न झालेले आहे.



Assistant. Superintendent
Civil Court.Jaysingpur.

४) येणेप्रमाणे वर नमुद केलेप्रमाणे वस्तुस्थिती असलेने भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम ५०३ ची तरतुद पहाता गुन्ह्यातील मुद्देमाल हा त्या मुद्देमालाचा तपास पुर्ण होताच तो मुद्देमाल परत मागणीकरिता केवळ सदर मुद्देमालावरती कायदेशीर हक्क व अधिकार असलेल्या इसमांना अटी, शर्तीवरती मुद्देमाल परत देता येतो अशी तरतुद असलेने प्रस्तुत कामी फिर्यादीची मुळ फिर्याद पहाता व तपास टिप्पणा दरम्यान नोंदविलेले जबाब पहाता व जप्ती पंचनामा पहाता अर्जातील मागणी केलेला मुद्देमाल हा अर्जदारांच्या मालकीचा नसलेचे स्पष्ट दिसून येत असलेने, अर्जदार यांना सदरचा मुद्देमाल परत मागणी करता येणार नाही. या व्यतिरीक्त यातील मुळ अर्जदार यांनी वि.प. म्हणून फिर्यादी यांना समाविष्ट केले नाही अगर फिर्यादी यांचे म्हणणे मागविणेबाबतही विनंती केली नाही.

५) **सबब विनंती की,**

अ) थर्ड पार्टी अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत यावा.

ब) यातील अर्जदार यांचा प्रस्तुतचा मुद्देमाल मागणीचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

क) जरुर अन्य अत्यावशक आदेश याच कामी थर्ड पार्टी अर्जदार यांचेवतीने देवविणेत यावेत.

येणेप्रमाणे अर्ज असा सही ता.२०/०६/२०२६

( अमीर फिरोज शेख )



20/6/26
Assistant. Superintendent
Civil Court.Jaysingpur.

**प्रतिज्ञा**

मी **श्री.अमीर फिरोज शेख**, व.व.२९, धंदा–व्यापार, रा.शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर आजरोजी जयसिंगपूर मुक्कामी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

वर नमूद अर्जा मधील संपुर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा सही ता.२०/०६/२०२६

( अमीर फिरोज शेख )

**ॲफिडेव्हीट**

मी यातील अर्जदार **श्री.अमीर फिरोज शेख**, व.व.२९, धंदा–व्यापार, रा.शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर आजरोजी जयसिंगपूर मुक्कामी सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो की,

वर नमूद अर्जा मधील संपुर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट असे सही ता.२०/०६/२०२६

ॲफिडेव्हीट करणार यास मी ओळखतो

( अमीर फिरोज शेख )

ॲडव्होकेट

( जे.डी.गावडे )



Assistant. Superintendent
Civil Court.Jaysingpur.

**प्रतिज्ञा**

मी **श्री.अमीर फिरोज शेख**, व.व.२९, धंदा–व्यापार, रा.शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर आजरोजी जयसिंगपूर मुक्कामी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

वर नमूद ॲफिडेव्हीट संपुर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा सही ता.२०/०६/२०२६

(अमीर फिरोज शेख)

Solemnly Affirmed before me by
Shri...Amir Firoz Shaikh...Age 29 Yrs
..........who is Occ. Business
of..............
identified by Shri..............
..........whom I know personally Today at Jaysingpur
Dated :- 20/6/26

Assistant Superintendent
Assistant. Superintendent
Civil Court.Jaysingpur.